ISSN : 3107-8591
Vol. 2, Issue 2, Apr - Jun 2026
**WADI : International Interdisciplinary E-Research Journal**
*A scholarly, peer-reviewed Research Journal*

# क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग: एक विश्लेषणात्मक अध्ययन

**संभाजी शिवाजी तरंगे**
संशोधक विद्यार्थी,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**डॉ. भूषण प्रदीप अहिरराव**
मार्गदर्शक
सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री, धुळे

**डॉ. मनिषा अनिल कचवे**
सह-मार्गदर्शक
भाऊसाहेब एन. एस. पाटील कला व एम. एफ. एम. ए. वाणिज्य महाविद्यालय, धुळे

**सारांश:**

*क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग हा अमेरिका, भारत, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार समुद्री लोकशाही राष्ट्रांचा एक लघुपक्षीय सुरक्षा मंच आहे. प्रस्तुत गटाची स्थापना ही प्रामुख्याने हिंद-प्रशांत क्षेत्रात मुक्त, सर्वसमावेशक आणि नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे. या शोधनिबंधामध्ये 'क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग' या आंतरराष्ट्रीय गटाच्या विविध पैलूंचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे. या संशोधनात प्रामुख्याने या गटाची उत्पत्ती, उद्दिष्टे तसेच त्यासमोरील समस्या आणि आव्हाने यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.*

**मुख्य शब्द:** चतुर्भुज सुरक्षा संवाद, हिंद-प्रशांत प्रदेश, लघुपक्षीय सुरक्षा मंच, शक्ति-संतुलन, आंतरराष्ट्रीय सुरक्षा

## प्रस्तावना

एकविसाव्या शतकात हिंद-प्रशांत प्रदेशाचे महत्त्व लक्षणीयरीत्या वाढले असून, जागतिक व्यापार, सामरिक सुरक्षा आणि समकालीन भू-राजकारणाच्या दृष्टीने हा प्रदेश केंद्रस्थानी आला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडी आणि विविध राष्ट्रांच्या धोरणांवर या प्रदेशाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. जागतिक स्तरावरील मोठ्या प्रमाणातील समुद्री व्यापार हा हिंद महासागर आणि प्रशांत महासागर यामार्गे होत असल्यामुळे या प्रदेशाला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. परिणामी, या प्रदेशात स्वतःचा प्रभाव निर्माण करण्यासाठी आणि नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी अमेरिका, भारत, चीन, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या महासत्तांमध्ये सामरिक स्पर्धा वाढताना दिसून येते.[1] भारताच्या दृष्टीने हिंद-प्रशांत प्रदेश हा केवळ आर्थिक हितसंबंधांपुरता मर्यादित नसून सामरिक आणि सुरक्षेच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जातो. ऊर्जा सुरक्षा, समुद्री व्यापार मार्गांचे संरक्षण तसेच प्रादेशिक स्थैर्य टिकवून ठेवणे या संदर्भात भारताची भूमिका अधिक व्यापक आणि प्रभावी होत आहे.[2]

समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणातील समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलत आहेत. या व्यवस्थेत निर्माण होणाऱ्या राजकीय, आर्थिक आणि सुरक्षाविषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यापक बहुपक्षीय संघटनांपेक्षा लहान आणि उद्दिष्टकेंद्रित गट अधिक प्रभावी ठरत असल्याचे दिसून येते. अशा गटांना किंवा संघटनांना लघुपक्षीय गट अथवा लघुपक्षीय संघटना असे म्हटले जाते. केई कोगा यांच्या मते, लघुपक्षीय गट किंवा लघुपक्षीय संघटना या संकल्पनेची स्पष्ट व्याख्या आढळून येत नाही. सामान्यतः, विशिष्ट विषयांमध्ये सामरिक समन्वय साधण्यासाठी आणि सहकार्य वाढवण्यासाठी तीन ते पाच राष्ट्रांनी तयार केलेल्या औपचारिक किंवा अनौपचारिक गटाला लघुपक्षीय संघटना असे म्हटले जाते. तथापि, एखाद्या गटाला लघुपक्षीय संघटना मानण्यासाठी आवश्यक असलेली राष्ट्रांची संख्या त्या प्रदेशातील विद्यमान बहुपक्षीय व्यवस्थेच्या स्वरूपावर अवलंबून असते.[3] या प्रकारच्या सहकार्यामुळे निर्णयप्रक्रियेला गती मिळते, सदस्य राष्ट्रांमधील सामरिक समन्वय अधिक मजबूत होतो आणि प्रादेशिक सुरक्षेला बळकटी मिळते. विशेषतः हिंद-प्रशांत प्रदेशात चीनच्या वाढत्या सामरिक आणि आर्थिक प्रभावाला संतुलित करण्याच्या दृष्टीने लघुपक्षीय गटांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. याशिवाय, आर्थिक सहकार्य, तंत्रज्ञान विकास, सागरी सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या विविध क्षेत्रांतही या प्रकारचे सहकार्य अधिक उपयुक्त आणि प्रभावी ठरत आहे.[4] हिंद-प्रशांत क्षेत्रात QUAD आणि AUKUS हे गट लघुपक्षीय संघटनांची प्रमुख उदाहरणे आहेत.

क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग हा अमेरिका, भारत, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार समुद्री लोकशाही राष्ट्रांचा एक महत्त्वाचा लघुपक्षीय सुरक्षा मंच आहे. या गटाची स्थापना प्रामुख्याने हिंद-प्रशांत क्षेत्रात मुक्त, सर्वसमावेशक आणि नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे. या गटाला चतुर्भुज सुरक्षा संवाद किंवा क्वाड )QUAD) असेही म्हटले जाते. हिंद-प्रशांत क्षेत्राचे वाढते महत्त्व आणि लघुपक्षीय गटांची वाढती भूमिका लक्षात घेता क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग या गटाचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग या आंतरराष्ट्रीय गटाच्या विविध पैलूंचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे. या संशोधनात प्रामुख्याने या गटाची उत्पत्ती, उद्दिष्टे तसेच त्यासमोरील समस्या आणि आव्हाने यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

**संशोधन पद्धती**

सदर संशोधनामध्ये प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या माहिती स्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीमध्ये क्वाड सदस्य राष्ट्रांनी प्रकाशित केलेली अधिकृत कागदपत्रे, संयुक्त निवेदने, शिखर परिषद घोषणापत्रे, तथ्यपत्रके तसेच सल्लामसलत अहवालांचा समावेश करण्यात आला आहे. ही माहिती संबंधित सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाशी संबंधित अधिकृत संकेतस्थळांवरून संकलित करण्यात आली आहे. दुय्यम माहिती स्रोतांमध्ये पुस्तके, अहवाल, आणि संशोधन निबंध, यांचा समावेश करण्यात आला असून, ही माहिती विविध जर्नल्स, संकेतस्थळे आणि ग्रंथालयांमधून संकलित करण्यात आली आहे. संकलित माहितीचा अभ्यास आणि विश्लेषण करण्यासाठी आशय विश्लेषण )Content Analysis) पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि उत्पत्ती**

क्वाडच्या उत्पत्तीचे आकलन करण्यासाठी सन २००४ मधील हिंदी महासागरातील त्सुनामी संकटाची पार्श्वभूमी अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. २६ डिसेंबर २००४ रोजी हिंदी महासागरात आलेल्या भीषण त्सुनामीमुळे भारत, श्रीलंका, इंडोनेशिया, थायलंड तसेच इतर अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर मानवी जीवितहानी आणि आर्थिक नुकसान झाले. या अभूतपूर्व नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित राष्ट्रांना तातडीच्या मानवतावादी मदतीची आवश्यकता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार राष्ट्रांनी परस्पर समन्वय साधत ‘त्सुनामी कोर ग्रुप’ या तात्पुरत्या सहकारी गटाची स्थापना केली. या गटामार्फत मदतकार्य, बचावकार्य आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक संसाधनांचे प्रभावी नियोजन व समन्वय करण्यात आले.[5] त्सुनामी कोअर ग्रुप हा कोणताही औपचारिक संघटनात्मक मंच नव्हता. या गटाकडे स्वतंत्र सचिवालय, स्थायी संस्थात्मक रचना अथवा औपचारिक जाहीरनामा नव्हता. हा पूर्णतः परिस्थितीनुरूप निर्माण करण्यात आलेला तात्पुरता सहकारी गट होता. हिंदी महासागरातील त्सुनामी संकटानंतर उद्भवलेल्या मानवतावादी आपत्तीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी या गटाची स्थापना करण्यात आली होती. अमेरिकेचे तत्कालीन वरिष्ठ राजनैतिक अधिकारी मार्क ग्रॉसमन यांच्या मतानुसार, या गटाची निर्मिती पारंपरिक आंतरराष्ट्रीय संघटनांच्या चौकटीपेक्षा भिन्न स्वरूपाची होती. संबंधित चार राष्ट्रांकडे आवश्यक आर्थिक व लष्करी संसाधने, प्रगत तांत्रिक क्षमता तसेच त्वरित कार्यवाही करण्याची राजकीय इच्छाशक्ती उपलब्ध असल्यामुळे त्यांना एकत्र आणण्यात आले. त्यामुळे हा गट औपचारिक संस्थात्मक संरचनेपेक्षा व्यावहारिक सहकार्य, तात्काळ समन्वय आणि संकट व्यवस्थापनाच्या तत्त्वांवर आधारित होता.[5] या सहकार्यामुळे संबंधित राष्ट्रांमध्ये परस्पर विश्वास, सामरिक समन्वय आणि प्रादेशिक सहकार्याची भावना अधिक दृढ झाली. पुढे या अनुभवाच्या आधारे हिंद-प्रशांत प्रदेशात दीर्घकालीन सामरिक सहकार्याची संकल्पना विकसित होऊ लागली. याच पार्श्वभूमीवर सन २००७ मध्ये क्वाड या लघुपक्षीय सामरिक मंचाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. त्यामुळे त्सुनामी कोअर ग्रुप हा क्वाडच्या स्थापनेचा प्राथमिक पाया मानला जातो.[6]

सन मे २००७ मध्ये क्वाडची पहिली औपचारिक बैठक ही ‘एशियन रिजनल फोरम’ बैठकीदरम्यान मनिला, फिलिपिन्स येथे झाली.[7] यालाच क्वाडचा पहिला प्रयोग किंवा क्वाड १.० म्हटले जाते. भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार लोकशाही राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी प्रथमच एकत्रितपणे हिंद-प्रशांत प्रदेशातील सामरिक सहकार्य, सागरी सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन तसेच प्रादेशिक स्थैर्य यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा केली. या प्रक्रियेमध्ये जपानचे तत्कालीन पंतप्रधान शिंजो आबे यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. त्यांनी ‘मूल्याधिष्ठित राजनय’ आणि ‘मुक्त व खुला हिंद-प्रशांत प्रदेश’ या संकल्पनांवर भर देत लोकशाही राष्ट्रांमधील सहकार्याची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांच्या मते, नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था, नौवहन स्वातंत्र्य आणि प्रादेशिक स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी समान मूल्ये असलेल्या राष्ट्रांनी परस्पर सहकार्य वृद्धिंगत करणे आवश्यक होते.[8] यानंतर सप्टेंबर २००७ मध्ये भारत, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया आणि सिंगापूर यांनी ‘मलबार नौदल सराव’ या संयुक्त नौदल कवायतीमध्ये सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळे क्वाड या सुरक्षा संवादाला अधिक स्पष्ट सामरिक आणि संरक्षणात्मक स्वरूप प्राप्त झाले.[8] परंतु अगदी थोड्या कालावधीतच क्वाडचा हा पहिला प्रयोग अयशस्वी ठरला. तन्वी मदान यांनी ‘द राइज, फॉल, अँड रिबर्थ ऑफ द क्वाड’ या लेखात क्वाड १.० च्या विघटणाची कारणे दिली आहेत ती पुढील प्रमाणे आहेत. सर्वप्रथम, चीनने या मंचाकडे स्वतःविरोधी ‘आशियाई नाटो’ अथवा चीनला नियंत्रित करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या गटाच्या दृष्टीने पाहिले आणि त्याविरोधात तीव्र राजनैतिक प्रतिक्रिया व्यक्त केली. चीनच्या या दबावामुळे विशेषतः ऑस्ट्रेलिया आणि भारत यांनी सावध भूमिका स्वीकारली. ऑस्ट्रेलियाचे तत्कालीन संरक्षणमंत्री ब्रेंडन नेल्सन यांनी चीनला आश्वासन दिले की ऑस्ट्रेलिया कोणत्याही चीनविरोधी सामरिक गटाचा भाग बनण्यास इच्छुक नाही. दुसरे महत्त्वपूर्ण कारण म्हणजे क्वाडचे प्रमुख समर्थक असलेले जपानचे पंतप्रधान शिंजो आबे यांनी सन २००७ मध्ये पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे क्वाड मागील प्रभावी

राजकीय नेतृत्व कमकुवत झाले. भारतामध्येही 'मलबार नौदल सराव' विरोधात डाव्या पक्षांनी तीव्र आक्षेप नोंदविले, कारण त्यांच्या मते हा मंच अमेरिकाप्रणीत सामरिक आघाडीचे स्वरूप धारण करीत होता. त्याच काळात भारताला 'अणु पुरवठादार गटाकडून' विशेष सवलती प्राप्त करण्यासाठी चीनच्या समर्थनाची आवश्यकता होती. त्यामुळे भारत चीनला उघडपणे नाराज करण्याच्या भूमिकेत नव्हता. याशिवाय, ऑस्ट्रेलियामध्ये केविन रुड पंतप्रधान झाल्यानंतर चीनसोबतचे आर्थिक संबंध अबाधित राखण्यासाठी त्यांनी क्वाड पासून काही प्रमाणात अंतर ठेवण्याचे धोरण स्वीकारले. अमेरिकेमध्येही काही धोरणकर्ते क्वाड विषयी विशेष उत्साही नव्हते, कारण त्यांच्या मते या मंचामुळे चीनसोबतचा तणाव वाढण्याची शक्यता होती. परिणामी, सदस्य राष्ट्रांमध्ये स्पष्ट सामरिक उद्दिष्टांची कमतरता, स्थिर नेतृत्वाचा अभाव आणि दीर्घकालीन बांधिलकी नसल्यामुळे क्वाडचा पहिला प्रयोग अगदी थोड्या कालावधीतच निष्क्रिय झाला आणि अखेरीस सन २००८ मध्ये त्याचे विघटन झाले.[8]

सुमारे एका दशकानंतर नोव्हेंबर २०१७ रोजी फिलिपिन्सची राजधानी मनिला येथे क्वाडचे पुनरुज्जीवन झाले. ही बैठक 'पूर्व आशिया शिखर परिषदेच्या' पार्श्वभूमीवर घेण्यात आली होती, यामध्ये भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार लोकशाही राष्ट्रांच्या वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवून हिंद-प्रशांत प्रदेशातील सहकार्याला नव्याने चालना देण्याचा निर्णय घेतला.[7] हा क्वाडचा दूसरा प्रयोग होता, यालाच क्वाड २.० असेही म्हटले जाते. २०१७ च्या पुनरुज्जीवनानंतर क्वाडने आपल्या कार्यपद्धतीत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. या कालखंडापासून या गटाने प्रथमच अधिकृत दस्तऐवज, संयुक्त निवेदने आणि धोरणात्मक आराखडे सार्वजनिकरीत्या प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला. ही प्रक्रिया क्वाडच्या स्वरूपातील मोठ्या परिवर्तनाची निदर्शक आहे. यामुळे हा गट केवळ एक अनौपचारिक चर्चात्मक मंच न राहता, त्याचे रूपांतर एका संस्थात्मक, पारदर्शक आणि समन्वयाधारित सामरिक गटामध्ये झाले असल्याचे स्पष्ट होते.

**क्वाडची उद्दिष्टे**

मे २००७ मध्ये क्वाडची पहिली आणि त्या काळातील एकमेव बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सहभागी देशांनी आपत्ती व्यवस्थापनासारख्या समान हिताच्या मुद्द्यांवर चर्चा केली. तसेच, आशिया-पॅसिफिक प्रदेशातील वाढते सहकार्य आणि सामायिक मूल्यांनाही महत्त्व देण्यात आले.[8] २०१७ च्या पुनरुज्जीवनानंतर क्वाडने अधिकृत दस्तऐवज आणि संयुक्त निवेदने सार्वजनिकरीत्या प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली, यामुळे क्वाडची उद्दिष्टे, प्राधान्यक्रम आणि कार्यपद्धती अधिक स्पष्टपणे समोर आली.

क्वाडच्या विविध बैठका आणि संयुक्त निवेदनांमधून हिंद-प्रशांत प्रदेशात शांतता, सुरक्षा, स्थैर्य आणि समृद्धी प्रोत्साहित करण्याचे व्यापक उद्दिष्ट अधोरेखित करण्यात आले आहे. मुक्त, खुली, सर्वसमावेशक आणि नियमाधारित हिंद-प्रशांत व्यवस्था निर्माण करणे,[9] तसेच आंतरराष्ट्रीय कायदा,[10] सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि समानतेच्या तत्त्वांचे संरक्षण करणे हे या सहकार्याचे प्रमुख उद्दिष्ट मानले गेले आहे.[11] समान लोकशाही मूल्ये, सामायिक हितसंबंध आणि परस्पर विश्वास यांच्या आधारावर सदस्य देशांमधील सहकार्य अधिक मजबूत करणे हे देखील महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणून मांडले गेले आहे.

प्रादेशिक संपर्क वाढवणे, गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधा विकास, आर्थिक सहकार्य आणि शाश्वत विकासाला चालना देणे हे क्वाडच्या धोरणात्मक उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. पारदर्शकता, आर्थिक व्यवहार्यता आणि आर्थिक जबाबदारी यांवर आधारित विकासात्मक उपक्रमांना प्रोत्साहन देत हिंद-प्रशांत प्रदेशातील दीर्घकालीन स्थैर्य आणि विकास मजबूत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.[11] भारताच्या 'ॲक्ट ईस्ट धोरणाच्या' माध्यमातून हिंद-प्रशांत प्रदेशातील सहभाग अधिक प्रभावी आणि व्यापक करणे हे सुद्धा या प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण उद्दिष्ट मानले गेले आहे.[9]

दहशतवादविरोध, अण्वस्त्र प्रसारबंदी, सागरी सुरक्षा, सायबर सुरक्षा तसेच मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवणे हे क्वाडच्या सुरक्षाविषयक उद्दिष्टांचे महत्त्वाचे अंग आहे. पारंपरिक आणि अपारंपरिक सुरक्षाविषयक आव्हानांना सामूहिक प्रतिसाद देण्यासाठी सदस्य राष्ट्रांमधील समन्वय अधिक मजबूत करणे, तसेच सागरी सहकार्य आणि प्रादेशिक आपत्ती प्रतिसाद व्यवस्था अधिक प्रभावी बनवणे ही उद्दिष्टे स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आली आहेत.[12]

एशियन राष्ट्रांचे केंद्रस्थानी महत्त्व आणि एशियन राष्ट्रांच्या नेतृत्वाखालील प्रादेशिक यंत्रणांना पाठिंबा देणे, तसेच हिंद-प्रशांत प्रदेशासाठी एशियन राष्ट्रांच्या सामायिक दृष्टीकोनाशी सुसंगत सहकार्य वाढवणे हे क्वाडच्या प्रादेशिक धोरणातील एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.[10,12] यासोबतच, प्रादेशिक देश, संस्था आणि विविध बहुपक्षीय मंचांबरोबर भागीदारी अधिक मजबूत करून समन्वय, सहकार्य आणि स्थैर्य वाढवणे, तसेच शांततापूर्ण, सुरक्षित आणि समृद्ध हिंद-प्रशांत प्रदेशाची निर्मिती करणे हे क्वाडच्या व्यापक धोरणात्मक उद्दिष्टांमध्ये समाविष्ट आहे.[13]

**समस्या आणि आव्हाने**

क्वाड समोर अनेक समस्या आणि आव्हाने उभी आहेत. क्वाड समोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे त्याच्याकडे चीन विरोधी गट म्हणून बघितले जाणे होय. सुरुवातीपासूनच चीनने क्वाडकडे संशयाने पाहिले असून त्याला शीतयुद्धकालीन विचारसरणीवर आधारित मंच म्हणून संबोधले आहे.[14]

तसेच, चीनच्या प्रभावाला मर्यादित ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेले धोरण आणि नाटोप्रमाणे ‘आशियाई सुरक्षा गट’ अशीही त्याची प्रतिमा निर्माण करण्यात आली आहे.[15] यामुळे हिंद-प्रशांत प्रदेशात भू-राजकीय तणाव आणि सामरिक स्पर्धा वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सदस्य राष्ट्रांचे चीनविषयीचे दृष्टिकोन आणि धोरणात्मक प्राधान्यक्रम पूर्णपणे सारखे नाहीत त्यामध्ये समान उद्दिष्टे आणि ठोस धोरणांचा अभाव आहे.[16] क्वाड समोरील दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे हिंद-प्रशांत प्रदेशातील वाढता सुरक्षा तणाव होय. क्वाड सदस्यांच्या सागरी सुरक्षा सहकार्य, नौदल सराव, मुक्त समुद्री वाहतूक उपक्रम आणि इतर सागरी योजनांमुळे दक्षिण चीन समुद्रामध्ये सामरीक स्पर्धा अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.[15] आर्थिक आणि तांत्रिक क्षेत्रातही क्वाड समोर अनेक अडचणी आहेत. चीनच्या ‘बेल्ट अँड रोड’ उपक्रमाला पर्याय निर्माण करण्यासाठी क्वाड सदस्यांनी पायाभूत सुविधा विकास, पुरवठा साखळी सुरक्षितता आणि तांत्रिक सहकार्याशी संबंधित विविध उपक्रम सुरू केले आहेत; मात्र हे उपक्रम अद्याप प्रभावी आणि व्यापक पर्याय म्हणून पूर्णपणे स्थापित झालेले नाहीत.[15] पुरवठा साखळी सुरक्षितता, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि माहितीचे स्थानिकीकरण यांसारख्या मुद्द्यांवर सदस्य राष्ट्रांमध्ये मतभेद दिसून येतात. कोविड-19 महामारीदरम्यान लस उत्पादन आणि वितरणात आलेल्या अडचणींमुळे क्वाडच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न निर्माण झाले. हवामान बदल, स्वच्छ ऊर्जा पुरवठा, सायबर सुरक्षा आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न होत असला तरी या विषयांमध्ये ठोस आणि समन्वित धोरण तयार करणे अजूनही कठीण आहे. तसेच पुरवठा साखळी अधिक मजबूत आणि सुरक्षित करण्यासाठी व्यापक आर्थिक आराखड्याचा अभाव असल्यामुळे क्वाड समोर आर्थिक क्षेत्रातही मोठी आव्हाने उभी आहेत.[17] हिंद-प्रशांत ही संकल्पना व्यापक आणि काही प्रमाणात अस्पष्ट असल्यामुळे क्वाडच्या प्रभावाची आणि कार्यक्षेत्राची निश्चित मर्यादा ठरवणे कठीण जाते. तसेच इंडोनेशिया सारखा महत्त्वाचा देश क्वाडमध्ये नसल्यामुळे हिंद-प्रशांत प्रदेशाचे संपूर्ण प्रतिनिधित्व होत नसल्याची टीका केली जाते.[14] एशियन राष्ट्रांचे केंद्रस्थानी महत्त्व हे देखील क्वाड समोरील एक महत्त्वाचे आव्हान आहे. अनेक एशियन राष्ट्रांना असे वाटते की क्वाडचा वाढता प्रभाव एशियन राष्ट्रांची प्रादेशिक भूमिका आणि एकता कमी करू शकतो. विशेषतः इंडोनेशिया सहित काही एशियन राष्ट्रांनी क्वाड बद्दल संशय व्यक्त केला असून तो एशियन राष्ट्रांच्या प्रादेशिक केंद्रस्थानासाठी आव्हान ठरू शकतो, अशी भूमिका मांडली आहे.[17]

**निष्कर्ष**

क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग हा हिंद-प्रशांत प्रदेशातील एक महत्त्वाचा लघुपक्षीय सुरक्षा मंच म्हणून उदयास आला आहे. २००४ मधील हिंदी महासागरातील त्सुनामीनंतर निर्माण झालेल्या सहकार्याच्या अनुभवातून त्याची संकल्पना विकसित झाली आणि २००७ मध्ये त्याची औपचारिक सुरुवात झाली. सुरुवातीच्या अडचणींमुळे क्वाड १.० निष्क्रिय झाला असला, तरी २०१७ मध्ये त्याचे पुनरुज्जीवन झाले आणि त्याने अधिक संस्थात्मक, पारदर्शक तसेच समन्वयाधारित स्वरूप धारण केले. क्वाडची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे मुक्त, खुली, सर्वसमावेशक आणि नियमाधारित हिंद-प्रशांत व्यवस्था निर्माण करणे, प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि स्थैर्याला चालना देणे, तसेच सागरी सुरक्षा, आर्थिक सहकार्य, दर्जेदार पायाभूत सुविधा विकास, सायबर सुरक्षा, दहशतवादविरोध आणि आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांमध्ये सदस्य राष्ट्रांमधील सहकार्य अधिक मजबूत करणे होय. तथापि, क्वाड समोर अनेक गंभीर आव्हानेही आहेत. चीनविरोधी गट अशी निर्माण झालेली प्रतिमा, सदस्य राष्ट्रांमधील धोरणात्मक मतभेद, वाढता प्रादेशिक सुरक्षा तणाव, आर्थिक आणि तांत्रिक सहकार्यातील मर्यादा, तसेच एशियन राष्ट्रांच्या केंद्रस्थानी असलेल्या भूमिकेबाबत व्यक्त होणाऱ्या चिंता यांमुळे क्वाडच्या प्रभावी कार्यक्षमतेवर प्रश्न निर्माण होतात. एकूणच, हिंद-प्रशांत प्रदेशातील बदलत्या सामरिक आणि भू-राजकीय परिस्थितीत क्वाड हा प्रादेशिक सहकार्याचा एक महत्त्वाचा मंच म्हणून उदयास आला आहे. त्याची भविष्यातील परिणामकारकता सदस्य देशांमधील समन्वय, दीर्घकालीन बांधिलकी आणि प्रादेशिक राष्ट्रांचा विश्वास संपादन करण्याच्या क्षमतेवर अवलंबून राहील.

**संदर्भ सूची**

1. Dar, Z. A., & Shah, P. I. A. (2025). India’s Strategic Engagement in the Indo-Pacific: A Blueprint for Regional Security. South India Journal of Social Sciences, 23(5), 62–65. https://doi.org/10.62656/SIJSS.v23i5.2103
2. Ladwig, W. (2024). The Indo-Pacific in Indian Foreign Policy. https://www.rusi.org/explore-our-research/publications/policy-briefs/indo-pacific-indian-foreign-policy
3. Koga, K. (2022). A New Strategic Minilateralism in the Indo-Pacific. Asia Policy, 17(4), 27–34. https://doi.org/https://www.jstor.org/stable/27254590
4. Singh, B., & Teo, S. (Eds.). (2020). Minilateralism in the Indo-Pacific: The Quadrilateral Security Dialogue, Lancang-Mekong Cooperation Mechanism, and ASEAN. Routledge.
5. Grossman, M. (2005). The Tsunami Core Group: A Step toward a Transformed Diplomacy in Asia and Beyond. Security Challenges, 1(1), 11–14. https://doi.org/https://www.jstor.org/stable/pdf/26459016.pdf?acceptTC=true

6. Chanlett-Avery, E. (2018). Japan, the Indo-Pacific, and the "Quad." Chicago Council on Global Affairs. https://www.jstor.org/stable/resrep17325
7. Ministry of External Affairs. (2025, February). Quad. Government of India. https://www.mea.gov.in/Portal/ForeignRelation/Unclassified_Quad_Brief_Feb_2025.pdf
8. Madan, T. (2017, November 16). The Rise, Fall, and Rebirth of the 'Quad.' War on the Rocks. https://warontherocks.com/2017/11/rise-fall-rebirth-quad/
9. Ministry of External Affairs. (2017, November 12). India-Australia-Japan-U.S. Consultations on Indo-Pacific. Government of India. https://mea.gov.in/press-releases.htm?dtl/29110/IndiaAustraliaJapanUS_Consultations_on_IndoPacific_November_12_2017
10. Ministry of External Affairs. (2019, November 4). India-Australia-Japan-United States Consultations. Government of India. https://mea.gov.in/press-releases.htm?dtl/32006/IndiaAustraliaJapanUnited_States_Consultations
11. Ministry of External Affairs. (2018, November 15). India-Australia-Japan-U.S. Consultations. Government of India. https://mea.gov.in/press-releases.htm?dtl/30593
12. Ministry of External Affairs. (2019, May 31). India-Australia-Japan-United States Consultations. Government of India. https://mea.gov.in/press-releases.htm?dtl/31403/IndiaAustraliaJapanUnited_States_Consultations
13. Ministry of External Affairs. (2018, June 7). India-Australia-Japan-US Consultations. Government of India. https://mea.gov.in/press-releases.htm?dtl/29961/indiaaustraliajapanus+consultations
14. Envall, H. D. P. (2019). The Quadrilateral Security Dialogue: Towards an Indo-Pacific Order? (pp. 1–11). S. Rajaratnam School of International Studies. https://rsis.edu.sg/wp-content/uploads/2019/09/PR190909_The-Quadrilateral-Security-Dialogue.pdf
15. Wei, Z. (2022). The evolution of the 'QUAD': Driving forces, impacts, and prospects. China International Strategy Review, 4(2), 288–304. https://doi.org/10.1007/s42533-022-00119-w
16. Heiduk, F., & Wirth, C. (2023). The Quadrilateral Security Dialogue between Australia, India, Japan and the United States. More symptom than solution to the problem of growing instability in the Indo-Pacific. SWP Comment, 1–7. https://doi.org/10.18449/2023C31
17. Vijaya, P. (2023, January 16). The Quad and ASEAN: Challenges and Prospects for Cooperation. 9(1). https://politicalreflectionmagazine.com/2023/01/16/the-quad-and-asean-challenges-and-prospects-for-cooperation/

***